# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०८/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. वेलतुर** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा बोथली शिवार येथे दिनांक ०५/०७/२०२२ चे १४.०० वा. ते दि. ०६/०७/२०२२ वा. १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. सुरेखा महेश आतीलकर वय ३८ वय रा. बोथली ता. कुही जि. नागपुर यांनी शेतात जावुन पाहीले असता त्यांचे बोरवेलचे दोर सोडुन मोटार व केबल वायर कि. ६,३००/—रू. तसेच व्हि मॉर्क कंपनीची २ एच पी १५ स्जेज कंपनी व व्हि मॉर्क कंपनीची १० बाय ०२ कि. ४,०३४/—रू. असा एकुण कि. १०,३३४/— रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतुर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संजय पायक मो.क्र. ८८३०९२३३१० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा मेंढे पठार शिवार उमरेड येथे दिनांक ०५/०७/२०२२ चे १४.०० वा. ते दि. ०६/०७/२०२२ वा. १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— प्रसाद नेताजी गजभिये, वय ३३ वर्ष, रा. अयोध्या नगर साईमंदीर रोड प्लॉट नं ८४ नागपुर यांचे मौजा मेंढे पठार शिवारातील शेतातील विहीरीजवळ असलेला कॉमेट कंपनीचा हिरवा रंगाचा डिझेल इंजीन किं १५,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अजितसिंग ठाकुर हे करीत आहे.

**३) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मेटपांजरा येथे दिनांक ०५/०७/२२ चे २३.०० वा. ते ०६/०७/२२ चे १०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— चंद्रकांत दामोदर फुकट, वय ४८ वर्ष, रा. सेमीनरी हिल नागपुर यांनी मेटपांजरा येथे टावर जवळ येवुन पाहले असता टावर पासुन ते मशीन पर्यंत लागुन असलेले केबलचे १२ पिस लांबी ८० मिटर किंमत अंदाजे ८,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशी सुनिल ठोबरे मो. न. ९०११०२६४१४ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील **बसस्टॉप काटोल** येथे दिनांक ०७/०७/२२ चे १७.३० वा. ते १७.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– **आकाश प्रकाश बळगुजर, वय २७ वर्ष रा. नागपुर टिमकी पोलीस चौकी जवळ** हा काटोल बसस्टॉप वर नागपुर जाणाऱ्या बसमध्ये चढत असता पॅन्टचे समोरील खिशात ठेवलेले २०,०००/–रू. अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशी सुनिल ठोबरे मो. न. ९०११०२६४१४ हे करीत आहे.

**५) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील आमडी वस्ती येथे दिनांक ०६/०७/२२ चे १०.०० वा. ते १०.०० वा. ते दिनांक ०७/०७/२२ चे १०.०० वा. सुमारास मौजा मनसर माईन येथे फिर्यादी नामे– प्रमोद किशनजी शेळके, वय ५९ वर्ष रा. चारगाव कॉलनी मनसर माईन क्वॉटर नं. ६२ ब्लॉक नं. १६ सुरक्षा अधिकारी असुन रात्रगस्त करीत असतांना माईन्स मधील मॅगनीज डम्प मध्ये एक लाल रंगाचा ट्रॅक्टर क्र एमएच– ४०/एल–७१०० अस्पष्ट व ट्रॉलीमध्ये अंदाजे २ टन फाईन्स (मॅग्नीज चा चुरा) किमंत १५,०००/–रु. अर्धवट भरलेली ट्राली पोपटी रंगाची मिळुन आल्याने व आरोपी फरार झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गजानन उकेबोन्द्रे मो.न. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

**६) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील कन्हान नदिच्या पात्रा जवळ चिकना घाट, कामठी येथे दिनांक ०७/०७/२२ चे १३.०० वा. ते दिनांक ०७/०७/२२ चे १२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– महेश विनायक कुलदिवार वय ५२ वर्ष, रा. शिवपंचायत मंदिर येरखेडा ता. कामठी जि.नागपूर हा तहसिल कार्यालय कामठी येथे मंडळ अधिकारी पदावर कार्यरत आहे. दि.०४/०७/२०२२ रोजी फिर्यादी हे आपल्या स्टॉपसह चिकना येथे रेती घाटची पाहनी करण्याकरीता गेले असता. चिकना नदीला लागून असलेल्या शेत सर्वे नं. ९/१ येथे ८२ ब्रास रेती किंमती १,६८,१००/– रू. चा साठा केलेला दिसून आला. दि. ०७/०७/२०२२ रोजी फिर्यादी याने पेनड्राईव्ह विडीओ पाहीले असता त्याला दिसून आले की, दोन जे.सी.बी मशिन ४ ट्रक व ३ ट्राक्टर हे रेतीचा चोरीचा उददेशाने घटातील रेती उचलत असल्याचे दिसून येते. वाहन क्र एम ४० एएल ७०४ मध्ये ४ ब्रास रेती किंमती १०,२५०/–रू रेती भरल्याचे दिसून येत आहे. असा एकूण ८७ ब्रास रेती किंमती १,७८,३५०/–रू याची रेती चोरून सदर नदी पात्राला लागुन असलेल्या शेत सर्वे नं. ९/१ येथे साठा केलेला दिसून येत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार यंगलवार हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत १५ कि मी अंतरावर मौजा शिवा येथे दिनांक ०३/०७/२०२२ चे ००.०० वा. ते दिनांक ०६/०७/२०२२ चे ०१.०० वा. दरम्यान फिर्यादी मुलगी वय २८ वर्ष यांच्या नावाने अज्ञात आरोपीने प्रोफाईल फोटो असलेले फेसबुक अकांउंटच्या माध्यमातून ईलेक्ट्रॉनिक स्वरूपाचा अश्लील संदेश पाठविले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ५०१ भादंवि. सहकलम ६७ माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक आचरेकर मो.नं ८३८००७२२११ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावर गोवारी येथे दिनांक ०७/०७/२०२२ चे २०.३० वा. दरम्यान आरोपी १) सुमित निरंजन भोतमारे, २) निरंजन भोतमारे, ३) बबलु भोतमारे व ४) माया भोतमारे सर्व रा. गोवरी ता. मौदा यांनी बाथरूमचे पाण्याचे कारणावरून फिर्यादी नामे– रोहीत लक्ष्मण वाट वय २४ वर्षे, रा. गोवरी ता. मौदा याचे घरी येवून शिवीगाळ करीत होते. तसेच आरोपीतांनी 'तुम्ही वाघाचे दुध पिले असाल तर घराचे बाहेर निघा, तुमचा मर्डर करतो' अशी धमकी देत असल्याने फिर्यादी त्याची आई व वडील घराचे बाहेर आले तेव्हा सदर आरोपीतांनी फिर्यादी व त्याचे आई वडीलासोबत झगडा भांडण करून आरोपीने फिर्यादीचे मांडीला चावला व फिर्यादीचे वडीलांना शिवीगाळ करून ढकलढूकल करून हातबुक्कीने मारहाण केली. तसेच आरोपी क्र. ४ हिने फिर्यादीचे आईचे केस पकडून ढकलढूकल केले तसेच शिवीगाळ करून मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार यंगलवार हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील वार्ड नं. ३ बालाजी लॉन जवळ सावनेर येथे दिनांक ०५/०७/२०२२ चे १९.०० वा. ते दि. ०६/०७/२०२२ वा. ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– मंगेश हरीभाउ पटे, वय ३९ वर्ष, रा. वार्ड नं. २ अवधुतवाडी सावनेर यांचा मोठा भाउ निलेश हरीभाउ पटे यांची एमएच–४०/जी– २२३६ क्रमांकाची काळया रंगाची स्प्लेन्डर कंपनीची मोटरसायकल ही आर्कीटेक पटे असोशिएट ऑफीस बालाजी लॉनजवळ त्या ऑफीस मध्ये घेवुन गेले. ती गाडी फिर्यादी यांनी बालाजी लॉनच्या बाजुला उभी करून ठेवली व ऑफीसमध्ये गेले. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी किंमती ५,०००/–रू. ची मोटरसायकल अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव मो. ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील रामाळेश्वर वार्ड रामटेक येथे दिनांक ०७/०७/२०२२ चे १६.३० वा. ते १६.३५ वा. सुमारास फिर्यादी नामे– दिपक पाढुरंगजी तांदुळकर, वय ३८ वर्ष, रा. रामाळेश्वर वार्ड रामटेक यांनी त्यांची एमएच– ४०/एच– ७२३० क्रमांकाची हिरो कंपनीची पॅशन प्रो घरासमोर उभी करून ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किमंत २०,०००/– रू. मोटरसायकल चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार राजेन्द्र अडामे मो.न. ९६३७४००८७३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**